महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय :- फेब्रुवारी – मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांबाबत...

# प्रकटन

फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे वाढीव गुण देण्यात येतात.

शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून क्रीडा प्रस्ताव तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून दरवर्षी विभागीय मंडळाकडे दि. ३० एप्रिल पर्यंत सादर केले जातात. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ या वर्षात माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) या परीक्षा नेहमीपेक्षा १० दिवस आधी आयोजित करण्यात आल्या असून सदर परीक्षांचा निकाल दि. १५ मे २०२५ पर्यंत जाहीर करणे मंडळाचा मानस आहे. त्यामुळे फेब्रुवारी–मार्च २०२५ परीक्षेतील खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दि. १५ एप्रिल २०२५ पर्यंत संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत.

तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड चे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळांकडे प्रचलित पध्दतीने दि. १५ एप्रिल २०२५ पर्यंत पाठवावयाचे आहेत.

तरी याबाबत सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक, व सर्व संबंधित घटकांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

पुणे–४११ ००४.
दिनांक–०६/०२/२०२५

(डॉ. माधुरी सावरकर)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

क्र.कोविमं/माध्य. व उच्च माध्य. परीक्षा/ 560
कोल्हापूर- ४१६००४
दि.१२/०२/२०२५

प्रति,
जिल्हा क्रिडा अधिकारी,
सांगली/सातारा/कोल्हापूर

विषयः- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ. १२ वी) फेब्रु./मार्च-२०२५ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खेळाडू व एन.सी.सी.स्काऊट गाईड विद्यार्थ्यांच्या प्रस्तावाबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ. १२ वी) फेब्रु./मार्च-२०२५ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खेळाडू व एन.सी.सी.स्काऊट गाईड विद्यार्थ्यांच्या प्रस्ताव सादर करताना राज्य मंडळ,पुणे यांचे उपरोक्त प्रकटनानुसार उचित कार्यवाही करावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर